पोलीस अधीक्षक, कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

# प्रेसनोट क्र. ५२ दिनांक २३/०९/२०२२

# जनसंवाद अभियान २०२२ अंतर्गत पालघर पोलीसांकडून जिल्ह्यातील सर्व पोलीस पाटील यांच्या कार्यशाळेचे आयोजन.

श्री बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांच्या संकल्पनेतून सुरू झालेले जनसंवाद अभियान २०२२ अंतर्गत गाव आणि प्रशासन यातील महत्वाचा दुवा असलेला पोलीस पाटील यांचे अधिकार व कर्तव्य याबाबत कार्यशाळा आयोजीत करण्यात आली होती. त्या अनुषंगाने दिनांक २३/०९/२०२२ रोजी मा. जिल्हाधिकारी कार्यालय पालघर येथे पालघर जिल्ह्यातील सर्व पोलीस पाटील यांची कार्यशाळा आयोजीत करण्यात आली होती.

सदर कार्यशाळेस जिल्ह्यातील एकूण २४४ पोलीस पाटील हजर होते व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अॅकेडमी, नाशिक येथील विधी निदेशक श्री. संजय पाटील यांना आमंत्रीत करण्यात आले होते. पोलीस पाटील यांचे गावस्तरावर कोणती जबाबदारी असते? त्यांची काय कर्तव्ये असतात? व ती कशाप्रकारे पार पाडायची? याबाबत श्री. संजय पाटील विधी निदेशक महाराष्ट्र पोलीस अॅकेडमी, नाशिक, श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, श्री. दिलीप गुट्टे, अपर जिल्हाधिकारी पालघर तसेच श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक पालघर तसेच यांनी उपस्थित सर्व पोलीस पाटील यांना मार्गदर्शन केले.

**पालघर जिल्ह्यातील सर्व पोलीस पाटील यांच्यात एकसुत्रता येण्यासाठी व कोणताही प्रशासकीय अधिकारी गावामध्ये गेला असता पोलीस पाटील यांचे जनमाणसात वेगळेपण दिसून यावे व सहज ओळखता यावे याकरीता पोलीस पाटील यांना निळ्या रंगाचे जॅकेट प्रदान करण्यात आले. महाराष्ट्रात प्रथमच पालघर पोलीसांकडून पालघर जिल्ह्यात हा उपक्रम राबविण्यात येत आहे.**

सदरचा कार्यक्रम हा श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, श्री. दिलीप गुट्टे, अपर जिल्हाधिकारी पालघर, श्री. किरण महाजन, निवासी उपजिल्हाधिकारी पालघर, श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक पालघर,श्री. नित्यानंद झा, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी बोईसर विभाग, श्रीमती निता पाडवी, उपविभागीय पोलीस अधिकारी पालघर विभाग, श्री. शैलेश काळे, पोलीस उप अधीक्षक (गृह) पालघर, तसेच पालघर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांच्या उपस्थितीत पार पडला.








जिल्हा